# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 December 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ डिसेंबर २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- राज्यघटना स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत संविधानावर विशेष चर्चेला प्रारंभ
- भविष्यात मुंबई फिनटेकची राजधानी होईल–मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडून विश्वास व्यक्त
- स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४च्या सॉफ्टवेअर फेरीत राज्यातल्या संघांची चमकदार कामगिरी

आणि

- मराठवाडा साहित्य परिषदेच्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाला उद्यापासून सुरुवात

****

राज्यघटना स्वीकृतीच्या अमृत महोत्सवानिमित्त लोकसभेत आजपासून संविधानावर विशेष चर्चेला सुरुवात झाली. संरक्षणमंत्री राजनाथ सिंग यांनी या चर्चेला प्रारंभ केला. देशाचं संविधान हा फक्त एखादा दस्तऐवज नसून, नागरिकांच्या आकांक्षांची अभिव्यक्ती असल्याचं, राजनाथसिंह यांनी नमूद केलं. नागरिकांनी तयार केलेलं हे संविधान, भारतीय मूल्यांवर आधारित असल्याचं, राजनाथसिंह यांनी म्हटलं आहे.

काँग्रेसच्या प्रियंका गांधी यांनी या चर्चेत भाग घेत, संविधान हे नागरिकांच्या संरक्षणाचं सुरक्षा कवच तसंच न्याय, एकता आणि अभिव्यक्तीच्या अधिकाराचं कवच असल्याचं मत व्यक्त केलं.

समाजवादी पार्टीचे नेते अखिलेश यादव यांनी, संविधान हा लोकशाहीचा आत्मा असल्याचं सांगितलं, तर तृणमूल काँग्रेसचे कल्याण बॅनर्जी यांनी गेल्या दहा वर्षात देशाची धर्मनिरपेक्ष वीण उसवत चालल्याची टीका केली.
संयुक्त जनता दलाचे नेते केंद्रीय मंत्री राजीवरंजन ऊर्फ लल्लनसिंह यांनी यावेळी बोलतांना, संविधानामुळे समाजाच्या सर्वच घटकांसाठी सामाजिक तसंच आर्थिक प्रगतीच्या कक्षा रुंदावतात, असं सांगितलं. आणीबाणी लागू करणं तसंच परिच्छेद ३५६ चा दुरुपयोग करण्याबद्दल काँग्रेसवर टीका केली.

****

राज्यसभेतला गदारोळ आजही कायम राहिला. काँग्रेसप्रणित विरोधी पक्षांनी सभापतींविरोधात आणलेल्या अविश्वास प्रस्तावावरून सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये खडाजंगी झाली. विरोधकांचा हा प्रस्ताव १४ दिवसांनी घेतला जाईल, विरोधक वेळोवेळी घटनात्मक कामकाज टाळून सभापतींच्या विरोधात मोहीम राबवत असल्याचं निरीक्षण सभापती जगदीप धनखड यांनी नोंदवलं. विरोधकांना सभापतींविरोधात प्रस्ताव आणण्याचा अधिकार आहे, मात्र त्यांनी संविधानाचं उल्लंघन केलं आहे, असं सांगतानाच, गेल्या तीस वर्षाच्या कार्यकाळात राज्यसभेच्या सभापतींविरोधात अशा किती नोटीस आल्या, ते सभागृहासमोर यावं असं सभापतींनी नमूद केलं. विरोधी सदस्यांच्या सदनातल्या तसंच सदनाबाहेरच्या वर्तनावर आणि आक्षेपार्ह वक्तव्यावर धनखड यांनी नाराजी व्यक्त केली.
विरोधी पक्ष नेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी आपल्याशी चर्चा करावी, असं आवाहन सभापतींनी केलं, मात्र तरीही गोंधळ सुरूच राहिल्यानं सभागृहाचं कामकाज सोमवारपर्यंत स्थगित करण्यात आलं.

****

संसदेवरच्या दहशतवादी हल्ल्याला आज २३ वर्षं झाली. १३ डिसेंबर २००१ रोजी पाच दहशतवाद्यांनी संसद भवन परिसरात घुसून केलेल्या गोळीबारात वीरमरण आलेले सुरक्षा रक्षक आणि कर्मचाऱ्यांना आज देशभरातून आदरांजली अर्पण करण्यात आली. यानिमित्त संसद भवनात आज राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभेचे अध्यक्ष ओम बिर्ला, केंद्रीय मंत्रिमंडळातले मंत्री, लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी, राज्यसभेतले विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खर्गे यांनी पुष्पांजली अर्पण केली. संसदेच्या दोन्ही सभागृहातही मौन पाळून या हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आलं.

****

भविष्यात मुंबई फिन-टेकची राजधानी होईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे. मुंबईत जिओ वर्ल्ड कन्व्हेन्शन सेंटरमधे वर्ल्ड हिन्दू इकॉनॉमिक परिषदेचं उद्घाटन करतांना ते बोलत होते. २०२८ ते २०३० पर्यंत ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचं उद्दिष्ट राज्य सरकार पूर्ण करेल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. १५ डिसेंबरपर्यंत ही परिषद चालणार आहे.

****

बांगलादेशात हिंदूंवर होणाऱ्या अत्याचारांबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केली आहे. ते आज मुंबईत पत्रकार परिषदेत बोलत होते. या संदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या खासदारांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना भेटण्याची वेळ मागितली होती, मात्र त्यांनी दिली नसल्याने हा विषय पत्रकार परिषदेत मांडल्याचे ठाकरे यांनी स्पष्ट केलं.

****

येत्या युवा दिनी अर्थात १२ जानेवारी रोजी शिर्डी इथं भारतीय जनता पक्षाचं प्रदेश अधिवेशन होणार आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थितीत हे प्रदेश अधिवेशन होणार असल्याचं, बावनकुळे यांनी सांगितलं. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त येत्या काळात तरूणाईला भाजपकडे आकर्षित करण्यासाठी अभियान सुरू करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन २०२४च्या सॉफ्टवेअर फेरीत राज्यातल्या संघांनी चमकदार कामगिरी केली आहे. देशातल्या विविध राज्यांतील संघांनी 'कन्व्हर्सेशनल इमेज रेकग्निशन चॅटबॉट', 'महिला सुरक्षा', 'मायक्रो डॉपलर आधारित लक्ष्य वर्गीकरण', 'ट्रॅफिक व्यवस्थापनासाठी एआय आधारित उपाय', 'लाइव्ह लोकेशन ट्रॅकिंग आणि टूडी ब्लूप्रिंटचे थ्रीडी मॉडेलमध्ये रूपांतर' या समस्यांवर उपाय शोधण्याचा प्रयत्न केला. यात काही केंद्रांच्या विद्यार्थ्यांनी बक्षिसांची कमाई केली आहे. त्यात मुंबईच्या वेलिंगकर इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट, नागपूरच्या यशवंतराव चव्हाण इंजिनिअरिंग, नवी मुंबईतील दत्ता मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग आणि छत्रपती

संभाजीनगर इथल्या एमजीएम विद्यापीठाच्या जेएनईसी तसंच राजर्षी शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाचा समावेश आहे.

****

मराठवाडा साहित्य परिषदेच्या ११ व्या अंबाजोगाई साहित्य संमेलनाला उद्यापासून सुरुवात होणार आहे. या संमेलनाचं उद्घाटन डॉ. शिरीष खेडगीकर यांच्या हस्ते होणार असून समारोप डॉ. आदित्य पतकराव यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. स्वागताध्यक्ष सुदर्शन रापतवार यांनी ही माहिती दिली. साहित्यिक बालाजी सुतार हे या संमेलनाच्या अध्यक्षस्थानी असणार आहेत, १५ डिसेंबर रोजी या संमेलनाचा समारोप होणार आहे.

****

जालना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने आज समृध्दी महामार्गावरील कडवंची शिवारात एका कंटेनरमधून अवैधरित्या वाहतूक केला जात असलेला ७७ लाख ११ हजार रुपये किमतीचा गुटखा पकडला. या कारवाईत पोलिसांनी गुटख्यासह कंटेनर असा एकूण एक कोटी २ लाख ११ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर इथल्या पुंडलिक नगर इथं राहणारा कंटेनर चालक संशयित इरफान रहीम सय्यद याच्यासह अन्य दोघांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक पंकज जाधव आणि पथकानं ही कारवाई केली.

****

बीड जिल्ह्यात गुन्हेगारीत वाढ झाली असून यावर प्रशासनाने उपाययोजना करावी, या मागणीसाठी आज मराठा समाजाच्या वतीने बीड जिल्ह्यात बंद पुकारण्यात आला. बीड शहरासह जिल्हाभरात सर्व ठिकाणी बंदला संमिश्र प्रतिसाद मिळाला. केज तालुक्यातील मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येचा यावेळी निषेध नोंदवण्यात आला. आरोपींना तात्काळ अटक करावी, अन्यथा मराठा समाज रस्त्यावर उतरेल, असा इशारा यावेळी आंदोलकांनी दिला.

दरम्यान, खासदार बजरंग सोनवणे यांनी या प्ररकरणाचा तपास सीबीआयकडे द्यावा, हे प्रकरण जलदगती न्यायालयात चालवावं, अशी मागणी केली आहे.

या बंदच्या पार्श्वभूमीवर पोलीस यंत्रणादेखील सतर्क झाली असून राज्य राखीव दलाच्या दोन तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत, अशी माहिती अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांनी दिली.

****

परभणी इथल्या अप्रिय घटनेच्या निषेधार्थ आज जालना इथल्या अंबड चौफुलीवर धरणे आंदोलन करण्यात आलं. या धरणे आंदोलनात आंबेडकरी अनुयायांनी मोठ्या संख्येने सहभाग घेत संबंधित व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. तसंच परभणी इथ पोलीस प्रशासनाकडून होत असलेल्या कारवायाचा थांबवण्यात याव्यात, अशी मागणी उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्याकडे निवेदनाद्वारे केली.

****

छत्रपती संभाजीनगर इथल्या कृषी विज्ञान केंद्राच्या वतीने आज ड्रोन विषयी माहिती आणि प्रात्यक्षिक कार्यशाळा घेण्यात आली. शेतकरी तसंच कृषी विषयात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना केंद्राचे विषयतज्ज्ञ दत्ता पाटील यांनी ड्रोनचे विविध प्रकार, ड्रोन उडवण्याचे प्रशिक्षण- परवानगी या बाबत सविस्तर माहिती दिली. प्राध्यापक गीता यादव यांनी ड्रोन विषयी जोड व्यवसाय, केंद्र आणि राज्य शासनाच्या अनेक योजनातून मिळणारे अनुदान या बद्दल सविस्तर माहिती दिली.

****

केंद्र सरकारच्या मार्गदर्शक सूचनेनुसार सर्व जिल्ह्यांमध्ये १६ ते २० डिसेंबर या कालावधीत अतिजोखमीच्या भागात कुष्ठमुक्त सुरक्षित महाराष्ट्र-कुसुम हे अभियान राबवण्यात येणार आहे, त्यानुसार लातूर इथं आशा आणि पुरुष स्वयंसेवक यांच्या मदतीने प्रत्यक्ष सर्वेक्षण होणार आहे. जिल्ह्यात २९१ उपेक्षित ठिकाणांवर विशेष लक्ष केंद्रित करुन जवळपास ३१ हजार ७६० व्यक्तींची शारिरीक तपासणी करण्यात येणार आहे. या तपासणीसाठी जिल्ह्यात २१ पथके तयार करण्यात आली आहेत. कुष्ठरुग्णांच्या सहवासात असलेल्या व्यक्तींना कुष्ठरोगाची लागण होवू नये, म्हणून रीफॅपीसीन गोळीची एक मात्रा यावेळी देण्यात येणार आहे. तरी तपासणीसाठी घरी येणाऱ्या पथकामार्फत तपासणी करून घेण्यात यावी, असं आवाहन आरोग्य विभागानं केलं आहे.

****

हिंगोली जिल्ह्यात राष्ट्रीय आरोग्य अभियांनातर्गत राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमाच्या वैद्यकीय पथकाकडून जिल्ह्यातील शुन्य ते १८ वर्ष वयोगटातील संशयित हृदयरोग रुग्णांसाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात आज टुडी-इको तपासणी शिबीर घेण्यात आलं. या शिबिरामध्ये १३० विद्यार्थ्यांची टुडी-इको तपासणी करण्यात आली.

****